नियमित दिवाणी दावा क्र.८५०/२०२२
नि.क्र.३७/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वकील श्री. एस.एम. मातोळे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मला ब्रम्हानंद व दत्तात्रय असे दोन भाऊ व दोन बहिणी आहेत. त्यापैकी दत्तात्रय मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दिवाणी दावा क्र.१३०/९७ वाटणीसंदर्भात दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याच्या निकालामध्ये दावा मिळकतीमध्ये (शेत व दोन घरे) प्रत्येकाचा १/५ हिस्सा पाडला होता. हे म्हणणे खरे नाही की, दोन घरामध्ये पाच हिस्से झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये ज्या मिळकती होत्या तेच प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्याचा निकाल लागला असल्यामुळे आम्हाला प्रस्तुतचा दावा देण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या स्वतंत्र मालकीचे दोन घरे असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, भुमी अभिलेख येथे मालमत्ता पत्रकावर आम्हा तिनही भावांची नावे लागले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.४ ते ७ तर्फे वकील श्री. टी.बी. शिंदे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या बहिणींना सदर दाव्यात समाविष्ट केले नाही. दिवाणी दावा क्र.१३०/९७ मध्ये मी घराची वाटणी मागितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्याच्या निकालाविरुध्द अपील दाखल केले आहे. घर मिळकत माझ्या स्वतंत्र मालकीची असल्यामुळे मी सदरचे अपील दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडीलोपार्जित मिळकतीच्या वाटण्या झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घर मिळकत माझी स्वतंत्र मिळकत असल्याबाबत मी पुर्वीच्या दाव्यात पुरावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तरी देखील सदर निकालामध्ये सर्वांचा हिस्सा असल्याचे कोर्टाने जाहीर केलेले आहे.

३. मी दिवाणी दावा क्र.१३०/९७ मधील निकालाविरुध्द अपील कधी दाखल केले आहे हे मला आठवत नाही. सदर घर मिळकती १९९३-९४ पासून माझ्या आईच्या नावे नोंद आहेत, त्याअगोदर सदर मिळकती माझ्या नावे होते. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र.१३०/९७ मध्ये सदर मिळकती १९९३-९४ पुर्वी माझ्या नावे असल्याचे नमूद केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घर मिळकतीमध्ये मी १/५ हिश्याची सदर दाव्यामध्ये मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये घर मिळकती समाविष्ट केल्या नव्हत्या. सध्यस्थितीत, आमच्याकडे वडीलोपार्जित तीन घर मिळकती आहेत. मिळकत क्र.३९४ व ४६५ असून तिसऱ्या घराचा नंबर मला आठवत नाही. सदर घर मिळकतीमध्ये आम्ही वाटणी मागितलेली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, घर मिळकत मी स्वतः खरेदी केल्याचे व त्यावर बांधकामासाठी खर्च केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घर मिळकती पुर्वीपासून माझ्या आईच्या नावे होते व आजही आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर घर मिळकतीमध्ये माझा व भावांचा सामाईक हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल

करण्यास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.13 17:13:18 +0530

दि.१३/०३/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.